**CNR NO- MHSO060017852023**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४०/२०२३**

मे.विजय ड्रेसेस तर्फे नरेश सुगंधी

**वि.**

कॅनरा बँक

## नि. क्र. ११ वरील आदेश
## (घोषित दि. २५/०४/२०२४)

०१] प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला बँकेतर्फे दाखल करण्यात आलेला असून म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापित करुन त्यांचे म्हणणे पटलावर घेण्याकरीता विनंती करण्यात आलेली आहे.

०२] अर्जदारातर्फे प्रस्तुत अर्जास प्रखर विरोध करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०३] अर्जदारांनी विशेष दिवाणी दावा क्र. ११०८/२०१९ मध्ये पारीत झालेला एकतर्फा हुकूमनामा रद्द करण्याकरीता अर्ज दाखल करण्यास झालेला ७ महिने २८ दिवसांचा विलंब क्षमापित होवून मिळण्याची विनंती मुळ अर्जाव्दारे केलेली आहे. सामनेवाला बँकेस नोटीस तामील होवूनही त्यांनी विहित मुदतीत आपले म्हणणे सादर न केल्यामुळे प्रस्तुत अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. बँकेच्या म्हणण्यानुसार बँकेमध्ये कर्मचा-यांच्या कमतरतेमुळे आवश्यक ती माहिती व कागदपत्रे प्राप्त करुन घेणे व वकिलांशी संपर्क करुन म्हणणे दाखल करण्यास विलंब झालेला आहे. सदरचा विलंब जाणिवपुर्वक करण्यात आलेला नसून म्हणणे दाखल करण्यास ४८ दिवसांचा विलंब क्षमापित करुन बँकेस म्हणणे दाखल करण्याची परवानगी देणे न्यायोचित होईल.

०४] असे दिसून येते की, मुळ अर्जदारा विरुध्द बँकेतर्फे दाखल करण्यात आलेला रक्कम वसुलीचा दावा दि.०६/०१/२०२३ रोजी एकतर्फा मंजूर झालेला आहे. सदरचा एकतर्फा हुकूमनामा रद्द करण्याकरीता अर्जदार विहित मुदतीत अर्ज सादर करु शकलेले नाहीत व त्यांना ७ महिने २८ दिवसांचा विलंब झालेला आहे. अश्या परिस्थीतीत सदर विलंब क्षमापीत होण्याच्या अर्जास व त्यांचे म्हणणे

पटलावर असणे आवश्यक आहे. बँकेतर्फे हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरीता दरखास्त दाखल केली असे अर्जदाराचे म्हणणे नाही. अश्या परिस्थीतीत जरी बँकेला म्हणणे दाखल करण्यास विलंब झालेला असला तरीही अर्जदाराच्या हक्कावर कोणतीही गदा आलेली नाही. विलंब माफीचा अर्ज गुणदोषांवर निकाली लावणेकरीता सामनेवाला यांचे म्हणणे पटलावर असणे आवश्यक आहे. सामनेवाला म्हणणे दाखल करण्यास जाणिवपुर्वक विलंब केला असे म्हणण्यास कोणताही वाव नाही. अश्या परिस्थीतीत म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापीत करुन सामनेवालातर्फे दाखल करण्यात आलेले म्हणणे पटलावर घेणे न्यायोचित असल्याचे माझे मत झालेले आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१] अर्ज मंजूर करण्यात येतो.

२] सामनेवाला यांना म्हणणे दाखल रकण्यास झालेला विलंब क्षमापित करुन त्यांनी दाखल केलेले म्हणणे पटलावर घेण्यात येते.

३] खर्च मुळ प्रकरणात.

AMIT ASHOKRAO KHANDALE Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE Date: 2024.04.25 17:30:41 +0530

**दि.२५/०४/२०२४.**

**(अमित अ.खंडाळे)**
**सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**पंढरपूर.**

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 25.04.2024 |
| Judgment/order signed by | : | |
| the Presiding Officer on | : | 25.04.2024 |
| Judgment/Order uploaded | | |
| on | : | 25.04.2024 |